नेने (हरी नारायण)

महानुभावी सारस्वत

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, स्वीयग्रंथमाला क्र. ४४ - ७।
पुणें.

# महानुभावी सारस्वत

१ अन्वयस्थळ,

२ वृद्धाचार,

३ लक्षणरत्नाकर.

लेखक
श्री. हरी नारायण नेने,
एम्. ए., एल्. टी., नागपूर.

प्रकाशक
दत्तो वामन पोतदार, बी. ए.
गंगाधरराव नारायणराव मुजुमदार, सी. आय्. ई.
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

शक १८५८ इ. १९३६

किमत ~~बारा~~ आठ आणे

# निवेदन

भा. इ. सं. मंडळ त्रैमासिकांतील महानुभावीय निबंधांचें पुनर्मुद्रण ऋद्धिपूरचे महंत श्री. गोपीराज महानुभाव यांच्या सूचनेवरून केलें आहे. पुनर्मुद्रित तिन्ही निबंध नागपूरचे रा. ह. ना. नेने यांनीं मंडळापुढें वाचिलेले आहेत. महानुभावी वाङ्मयाचा अभ्यास सांप्रत वाढत आहे. अशा अभ्यासकांची सोय व्हावी आणि सांप्रदायिकांसहि लाभ घेतां यावा म्हणून ही योजना केली आहे. या प्रयोगास उत्तेजन मिळाल्यास तो पुढें चालविण्यास हुरूप वाटेल.

पौष शु. ९।५८—२३।१२।३६<br>
भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

दत्तो वामन पोतदार<br>
चिटणीस भा. इ. सं. मंडळ.

# महानुभावी सारस्वत

## १ अन्वयस्थळ*

१ महानुभावी पारमांडल्य आम्नायाचे गोपाळ पंडीत अथवा आणो वास यांच्या लक्षणरत्नाकराविषयीं मीं भा. इ. सं. मं. च्या २३ वे संमेलनप्रसंगीं थोडीशी माहिती दिली. आज, या शाखेंत झालेल्या प्रमुख ग्रंथांची व शिष्यांची हकीकत देणारा **अन्वयस्थळ** हा छोटासा ग्रंथ उपलब्ध झाल्यानें त्याची माहिती देण्याचें योजिलें आहे. त्यावरून पूर्वीच्या माहितीवर आणखी प्रकाश पडण्यासारखा आहे.

२ रा. रा. यशवंत खुशाल देशपांडे यांच्या ' महानुभावीय मराठी वाङ्मय' पुस्तकाचे १०९—११० पानांवर जी वंशवेल दिली आहे, तीबद्दल जास्त माहिती प्रस्तुतच्या छोट्याशा प्रकरणावरून मिळेल. तसेंच इतर उल्लेखांवरून कांहीं गोष्टींना आणखी बळकटी येते.

३ पारमांडल्य आम्नायाचा मुकपाठ, दृष्टांत, पूजावस्वर, नामाचे दाहा ठाय, स्मृतीच्या आदी[1], चरित्राच्या आदी, इत्यादि प्रकरणें या पोथींत आहेत. पोथी नेहमींप्रमाणें महानुभावी बांधणीची असून, सांकेतिक लिपींत आहे. अक्षर सुवाच्य व वळणदार आहे. शेवटीं लेखनशक वगैरे कांहीं नसलें तरी पोथी निदान १००–१५० वर्षांहून जुनाट असावी असें कागद व अक्षरांचें वळण यांवरून वाटतें. ही पोथी माहूरचे महंत दत्तराज माहूरकर यांचेकडे पाहावयास मिळाली. ही शिवाय आणखी ११२ पोथ्या इतरत्र मिळाल्या.

४ या प्रकरणाचा आरंभ ' श्रीपरेशाय नमः ' असा नमनपूर्वक ' केसीराज वासीं भटों[2] वियमान द्वादशप्रकरणवचनपाठान्वयो[3] लाविला ' असा आहे. शेवटीं ' ऐसे बागुड वाह्या वासाचे कृष्णो वास सांघति ॥ एवं अन्वयस्थळ समाप्तिः ॥ ' असें वाक्य आहे. असेरीस ' वृद्धाचार ' म्हणून एकपानी प्रकरण आहे. या सर्वांची प्रत निबंधाला जोडली आहे.

५ नागदेवाचार्यांच्या हयातींत केशिराज वासांनीं[4] चक्रधरसूत्रांच्या प्रकरणांचा नीट अन्वय लाविला, तो 'सालसेयाचिये धाडिसीं गेला' म्हणजे नाहींसा झाला. नागदेवाचार्य हे गेल्यानंतरच्या काळांतील देवगिरीवरील मुसलमानांची स्वारी म्हणजे अलाउद्दीनाचा विश्वासू सरदार मलिक काफूर याची होय. त्यानें इ. स.

---

* पा. स. ५।१८५८. भा. इ. सं. मं. त्रै. वर्ष १७ अं. २ पृ. ५५. १ आरंभींचा मथळा. २ नागदेवाचार्य–भटो वास. ३ चक्रधरोक्त सूत्रपाठ पद्य. ४ रत्नमालास्तोत्राचे कर्ते.

१३०८ मध्यें देवगिरीच्या रामदेवराजाला कैद करून दिल्लीस पाठविलें. तेव्हां 'खालसेयाची धाडि' म्हणजे 'खिलजीची स्वारी' असावी असें वाटतें. इ. स. १३२१ मध्यें खिलजी घरण्याचा शेवट झाला. सारांश, नागदेवाचार्यांच्या निधनानंतर [ इ. स. १३०२, शके १२२४ ] दक्षिणेंत झालेली स्वारी म्हणजे मलिक काफूरची. ती १३०८ मध्यें झाली. यावरून केशो बासांनीं तयार केलेला 'सूत्रपाठ' या 'धाडींत' नाहींसा झाला. पण देशांत शांतता झाल्यावर भास्करभट बोरीकर अथवा कविश्वर बास, परशराम बास व रामेश्वर बास या तिघांनीं मिळून एके ठिकाणीं बसून, स्वतःला कंठगत असलेल्या भागाचें नीट संकलन केलें. पुढें हाच 'सूत्रपाठ' कवीश्वर आम्नायांत रूढ मानला गेला. व याचेंच स्पष्टीकरण करण्यासाठीं पुढें अनेक महानुभावी ग्रंथ त्यावर रचिले गेले. सध्यां विशेष मान याच सूत्रपाठाला दिला जातो.

६ कवीश्वर आम्नायांतील ही गोष्ट पाहून, पारमांडल्य आम्नायांतील प्रवर्तक गोपाळ पंडित अथवा आणो बास यांचे शिष्य **नागनाथ बास** यांनीं आणो बासांना विनवणी केली " जैसा कविश्वर आम्नायिं द्वादशप्रकरणासि अन्वयो असेः तैसा तुम्ही लावावाः तुम्हांसि गोसावियांचे[1] वरद[2] असे. " ही विनंति स्वीकारून आणो बासांनीं " नवां[3] प्रकरणां अन्वयो लावीला " यानंतर आणो बासांनीं 'लक्षणरत्नाकरांत' वर्णिलेलीं 'द्वात्रिंशल्लक्षणें' रचिलीं, " **बत्तीस लक्षणें**ः गोसावी ( चक्रधर ) महाराष्ट्रभापाः म्हाइभटांप्रति ( लीळाचरित्रकार )ः नीरुपीलीं होतींः तींयें संस्कृतें केली. " म्हणजे **बत्तीस लक्षणें श्रीचक्रधरांनीं म्हाइभटाला मराठींत वर्णन करून सांगितलीं होतीं तीं आणो बासांनीं संस्कृतांत केलीं.** पूर्वींच्या निबंधांत केलेल्या विधानाला यामुळें चांगलीच बळकटी येते.

७ यानंतर 'आचार व विचार' हीं प्रकरणें तयार करण्यासाठीं आणो बासांनीं लीळाचरित्रांतून वचनें निवडून काढलीं होतीं; पण 'अन्वय' लावण्यास ते जगले नाहींत. अशाप्रकारें आनेराज पंडितांसंबंधीं माहिती यांत सांपडते.

८ यापुढें **बाणाइसाचे** शिष्य **हरी बास** यांनीं 'वेळ्ळापूर चरित्र' सीधांतसाखळि, मांडणी, मूलसंचरण, या प्रकरणांचा 'अन्वय' लावल्याविषयीं उल्लेख आढळतो.

९ त्यानंतर हरि बासाचे **तळेगांवकर दत्तो बास** यांनीं हीराइसा, रामेश्वर, परशुराम यांचीं मतांतरें लक्षांत घेऊन व हिराइपाठाला विशेष मान देऊन

---

१ श्रीचक्रधर. २ वरदान, आशीर्वाद. ३ चक्रधरसिद्धान्तसूत्रें प्रस्तावना पहा; आचार, विचार, दृष्टांत इतकीं प्रकरणें आनेराज बासांनीं 'अन्वय' करण्याचीं राहून गेलीं. एकंदर प्रकरणें १२.

श्रीकृष्णचरित्र, गोविंदप्रभूचें चरित्र, श्रीचक्रधरांचें चरित्र (पूर्वार्ध, उत्तरार्ध, अज्ञातलीळा) इत्यादि एक करून तयार केलीं. लीळांच्या आरंभाचे मथळ्यांची नोंद केली. कांहीं '**प्रमेय**' ग्रंथ तयार केले. केशिराजांच्या दृष्टांतस्तोत्रावरून ११४ श्रीमुखदृष्टांतांचा अन्वय लाविला. आणो वासांनीं निवडलेल्या वचनांचा अन्वय लाविला.

१० पुढें दत्तो बास जिवंत असतांनाच, नागनाथ बासाचे शिष्य **कवि मालो बास** यांनीं स्मृति, वृद्धाचार, रत्नमालिकास्तोत्रांतील तुटलेला सांधा, पंगुस्तोत्र, नामावळी स्तोत्र, इत्यादि ग्रंथ केले; इतक्यांत त्यांचें देहावसान झालें.

११ यानंतर, वत्सहरणकर्ते दामोदर पंडीत यांच्या सारख्या चौपद्या करणारे व **वामन बासाचे** शिष्य **शिवमुनि** यांची ग्रंथरचना येते. 'तेहीं पंडीताचीया ( दामोदर पंडित ) चौपदीया सारीखीया साटी चौपदीया केलीयाः तेथ **अभंगीं** पारमांडल्य हेंचि नामः" या ठिकाणीं **अभंग** शब्दाचा अर्थ नीट लक्षांत ठेवण्यासारखा आहे. 'चौपदीच्या शेवटच्या ओळींत नांव घालणें' असा निदान वरील ओळीचा तरी अर्थ आहे.

१२ आणो बासापासून ज्यांना उपदेश झाला असे पैठणचे **हिरण्यगर्भ बास** अथवा हयग्रीवाचार्य यांनीं केलेल्या 'गद्यराज' या **काव्याचा** नंतर उल्लेख आलेला आहे. 'गद्यराज' हें निर्यमक काव्य आहे. त्यांत स्रग्धरा, वसंततिलका, मालिनी, शार्दूलविक्रीडित इत्यादि वृत्तांचा उपयोग केला असून, काव्यवर्णन श्रीकृष्णाच्या अवतारासंबंधीं आहे.

१३ एका पोथींतील शेवटची ओळ पुढील प्रमाणें आहेः "हें अन्वयस्थळ दाम बासाचेः केशोबा चाउरकरः त्यापासौनि लिहीलें."

१४ यानंतर वागुड चाह्या बासांच्या संबंधीं माहिती आहे व शेवटीं थोडासा वृद्धाचार म्हणजे नंतरच्या मंडळीविषयीं जी परंपरेनें माहिती मिळाली ती दिली आहे.

१५ वर वर्णन केलेल्या ग्रंथांपैकीं, आनो बासांचा 'मुकपाठ' 'संस्कृत लक्षणरत्नाकर' व हयग्रीवाचार्यांचा 'गद्यराज' या पोथ्या प्रत्यक्ष वाचावयास मिळाल्या.

१६ आतां अन्वयस्थळ व वृद्धाचार यांचें मूळ येथें देतों.

## अन्वयस्थळ

केसीराज बासीं भटां वीद्यमान द्वादशप्रकरणवचनपाठान्वयो लावीला : तो खालसेयाचिये धाडिसी गेला : मगः कवीश्वरीं परशराम बासींः रामेश्वर बासींः द्वादशप्रकरणवचनपाठान्वयो लावीलाः तो कवीश्वरआम्नायिं

प्रवर्तला : तें देखौनि नागनाथ बासीं आणो बासातें प्रार्थिलें : जैसा कवीश्वरआम्नायिं द्वादशप्रकरणासि अन्वयो असे : तैसा तुम्ही लावावा : तुम्हांसि गोसावियांचे वरद् असेः तें आणो बासिं मानिलें : मग आणो बासीं : पूर्वी–पंचकृष्ण–नवां प्रकरणां अन्वयो लावीला :।: बत्तीस लक्षणें : गोसावी : महाराष्ट्रभाषा : म्हाइभटाप्रतिः निरुपीलीं होतीं : तीयें संस्कृतें केली : सुभाषीत स्तोत्र केलें : प्रमाणांचें व्याख्यान केलें : मग आचारस्थळ :।: वीचारस्थळ : अन्वयो लावावेया : चरीत्रांतुलें वाक्यें वेगळीं नीवडीलीं : अच्युतगोत्रेसिं परमप्रीति करावी : या वचनापासौनि : श्रेष्ठत्व नष्टत्व न प्रकाशे : येथपर्यंत एकवटलीं : तीयें पारिमांडल्याम्नायीं प्रवर्तलीं : इतुकेनि आणो बासांचें देहावसान जालें : आणो बासांची बानाइसें : त्याचें हरी बास : तेहीं बेलोपुरीचीं चरीत्रें नीवडुनि सिधांत पाठाचें नीरुपण :।: सीधांत साखळी :।: मांडणी : मुलसंचरण : अन्वयीं लावीलें : ते पारिमांडल्यआम्नायीं प्रवर्तलें : इतुकेन तयाचें देहावसान जालें : तया हरि बासाचे तळेगांवकर दत्तो बास : तेंही हीरंबापाठ प्रधान करुनि : परशराम बास : रामेश्वर बास : आणिकही आचार्ये तयाचीं वासनातरें एकवटुनि पुर्वार्धचरीत्रें : उत्तरार्धचरित्रें : द्वापारचरित्रेंः ऋधपुरचरित्रें अजातचरीत्रें : अन्वयीं लावीलीं : सकळचरित्राचीया आदि टांचिलीयाः चतुर्वीधस्मरण : चहुं पदार्थाचें ज्ञान : मुंढज्ञान : एणें नामें प्रमयें केलीं : डोबेग्रामीचें तीन्ही पुजावसर अन्वयीं लावीले : दृष्टांतस्तोत्राचेनि अनुक्रमें श्रीमुखदृष्टांत अन्वयीं लावीले ः।: आणो बासीं अन्वयो लावावेया जो वचनपाठ नीवडला होता : तयाचा अन्वयो लावीला : तो ऐसा : आणो बासीं प्रमाणाचें व्याख्यान केलें होतें : तेथ आचारद्वीध बोलिला होता : अनुसरण : त्यागुभेदा : त्यामाजिं अनुसरण शब्दाचें : अनुसरण स्थळ केलें : आणि : त्यागभेद् शब्दाचें त्यागभेद् स्थळ केलें : त्याचिपरी आणो बासीं प्रमाणाचें व्याख्यान केलें होते : तेथ वीचारद्विध बोलिला होता : संबंध :।: साधन :।: त्यामाजिं संबंध शब्दाचें संबंधस्थळ केलें :।: साधन शब्दाचें साधनस्थळ केलें : ऐसीं तळेगावकर दत्तो बासीं पाठाचीं चारीं स्थळें अन्वयीं लावीलीं : मग : या चौ स्थळाचीया अर्थाचीं साधकें :।: पाठवचनें : एकवटलीं : तो मुक्तपाठ :।।: या उपरी दत्तो बासाचा वियमानीं नागनाथ बासाचें सीख्य कवी मालो बास : तेहीं स्मृति :।: वृद्धाचार : केसो बासाचीया रत्नमाळामाजिं तुटी होती ते सांदिली : पुढारें साधावें तव अवकाश न पुरेचि : पंगुस्तेत्र केलें : नामावळि स्तोत्र केलें : स्मृतिसस्कृता

करित होते ते साटी श्लोक केले : एक म्हणती : सवाशें : तवं देहावसानें जालें : वामन बासाचें विश्वनाथमुनि : तेहीं पंडिताचीया चौपदीया सारीखीया साटी चौपदीया केलीया : तेथ अभंगीं पारमांडल्य हेंचि नाम : येचि वर्तमानीं आणोबा वासाचें सीख्य हीरण्यगर्भ बासीं पैठणीं भोगनारायणीं गर्थे केलीं : ऐसा पारमांडल्य आम्नायीं शास्त्रान्वयो लावीला ॥:

हें अन्वयस्थळ दाम बासाचे केशोबा चाउरगांवकर : त्यापासौनि लिहीलें : ॥ शोध ॥ :

## २ वृद्धाचार

तळेगांवकर दत्तो बास : त्याचें गोंदाओ बास : त्याचे उफाळे चाह्या बास : तेहीं वीज्ञानविशेषावाचक : अपरावाचक : ऐसीं सुभाषित अंताक्षेरीची टीका केली : ते बागुड चाह्या बासीं सोधीली असे ॥: वीनाएक बासीं केसो बासाचीया रत्नमालामार्जि आधिक नीरुपण होतें : तया नीरुपणाचें श्लोक हीरांबापाठामार्जि ठाइं ठाइं लीहीलें असत : जगद्दात्मा : सर्वकर्ता : जगदेश्वर : एवमादिक गोसावीयाचीं नामें अर्थवसें लीहीलीं असत : तेणें तो पाठ भीन्न जाला असे : ऐसे बागुड चाह्या बासाचे कृष्णो बास सांघति : एवं अन्वयस्थळ समाप्ति ।

ईश्वरुपरमार्गि नागार्जुनभट आचार्य : त्यापासौनि दोनि आम्नायें : पारमांडल्यआम्नाये : कवीश्वरआम्नाये ॥:

पारमांडल्यआम्नायीं : आणो बास : त्यांचीं बाणाइसें : त्याचें हरी बास : त्याचें दत्तो बास त्याचे भानु पंडीत गोंदावो बास : त्याचे उफाळे चाह्याव बास : त्याचे विनाएक बास : विनायक बासाचे तीघे शिष्य : बाऊबास : दीवाकर बास : बागुढ चाह्या बासाचे जैतावो बास : त्याचे चाह्या बास ॥ ० ॥

आता देव बासाचे तुकावो बास : त्याचे भाया बास : त्याचे गोपाळ बास : त्याचे मंडळीक बास : ॥० ॥ आतां बाउ बासाचें केसो बास : त्यांचे महादेवो बास : एवं वृद्धाचार* समाप्ति ॥:

---

* भा. इ. सं. मं. त्रै. व. १७ अं. २ पृ. ५९.

# ३ लक्षणरत्नाकर.*

१ ज्याप्रमाणें 'श्रुतीं'चा अर्थ स्पष्ट करण्याकरितां शिक्षाकल्पव्याकरणादिकांची उत्पत्ति झाली किंवा स्मृति, सूत्रें, वार्तिकें, भाष्यें, महाभाष्यें इत्यादि वाङ्मयग्रंथांची निपज झाली, त्याचप्रमाणें महानुभावीय पंथप्रवर्तक श्रीसर्वज्ञ चक्रधर यांच्या वचनांना श्रुतितुल्य लेखून, त्या वचनांचें स्पष्टीकरण व यथार्थज्ञान व्हावें म्हणून, नागदेवाचार्य अथवा भटो बास (जन्मशक ११५८–मृत्युशक १२२४) यांच्या नजरेखालीं त्या काळच्या महानुभावीय पंडितांनीं, संस्कृत वाङ्मयाचा उज्वल आदर्श डोळ्यांपुढें ठेऊन मराठी भाषेंत विविध प्रकारची उत्कृष्ट ग्रंथरचना करून मराठी भाषेची अमूल्य सेवा केली. गोपाळ पंडित अथवा आनो बास (अनंत मुनि व्यास) हे त्या काळच्या महनीय पंडितांच्या मालिकेंतील असून, त्यांचा प्रस्तुतचा 'लक्षणरत्नाकर' हा छोटासा संस्कृत ग्रंथ, महानुभावांना मान्य व प्रमाणभूत अशा महत्त्वाच्या ग्रंथांपैकीं एक आहे.

२ लक्षणरत्नाकर व आनो बास यांच्यासंबंधीं उपलब्ध असलेली माहिती वाचकांना पुढील स्थळीं सांपडेल. कै० भावे यांचे महाराष्ट्र सारस्वत, नवीन आवृत्ति भाग पहिला, पान १०२ व रा. रा. यशवंत खुशाल देशपांडे यांच्या 'महानुभावीय मराठी वाङ्मय' या पुस्तकांतील पान ३३, ३५, ४६, ४७ यांमध्यें दिलेली माहिती अगदीं त्रोटक आहे. रा. रा. देशपांडे यांनीं लक्षणरत्नाकरांतील बत्तीस लक्षणांपैकीं 'निर्णय' या एका लक्षणासंबंधींचें मूळ संस्कृत पोथींतील अवतरण दिलें आहे. यापेक्षांही परंपरेची जास्त माहिती महंत दत्तराज महानुभाव यांनीं 'पंचवार्तिक' या छोट्याशा ग्रंथाच्या प्रस्तावनेंत दिली आहे. हा ग्रंथ ७–८ वर्षांपूर्वीं रा. रा. मो. ससाने यांनीं संपादित केलेला आहे. पंचवार्तिकाचे शेवटचें प्रकरण 'सूत्रस्वरूप–लक्षण' याचा व लक्षणरत्नाकराचा प्रतिपाद्य विषय एकच आहे, एवढेंच नव्हे, तर लक्षणरत्नाकरावरूनच मराठींत थोडक्यांत मुख्य मुख्य गोष्टींचा अनुवाद केला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. लक्षणरत्नाकराला द्वादोचांच्या मोठ्या व्याकरणाची उपमा दिली तर 'सूत्रस्वरूप लक्षण' हें त्यांच्या लघुव्याकरणाप्रमाणें समजावें लागेल. सारांश 'लक्षणरत्नाकर' हा ग्रंथ पूर्ण स्वरूपांत आज प्रथमच वाचकांपुढें सादर होत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आजपर्यंत बत्तीस लक्षणांपैकीं केवळ एका निर्णयलक्षणाखेरीज वाचकांपुढें इतर लक्षणांसंबंधींचा मूळ संस्कृत ग्रंथ अज्ञात स्थितींत होता असें म्हणणें भाग पडतें.

---

* भा. इ. सं. मं. त्रै. व. १७ अं. ३ पृ. ९८–११३.

३ या बत्तीस लक्षणांवर पंडित शारंगधर पुसदेकर यांचा एक मराठींतील टीपग्रंथ व 'बत्तीस लक्षणाची टीप' म्हणून दुसरा कोणी केलेला एक मराठी टीप ग्रंथ (ही टीप 'पंचवार्तिक' कर्ते पंडित भीष्माचार्य यांची असावी असें कांहांचें म्हणणें आहे) यांचा उल्लेख रा. देशपांडे यांनीं आपल्या 'महानुभावीय मराठी वाङ्मयांत' केला आहे. प्रण त्यासंबंधीं नामोल्लेखाव्यातिरिक्त माहिती त्यांना त्यावेळीं मिळाली नव्हती असें दिसतें. रा. रा. आबा चांदोरकर यांनीं लिहिलेला, 'बत्तीस लक्षणाची टीप' यांतील प्रारंभाचा व शेवटचा भाग, व इतर थोडी माहिती देणारा एक निबंध, इ. स. १९२०–२१ मध्यें भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध झाला आहे. त्यांच्या प्रतिपादनावरून त्यांना "बत्तीस लक्षणाची टीप" उपलब्ध झाली होती असें दिसतें. पण तीच ग्रंथ लक्षण-रत्नाकर असावा असें वाटून, त्याच्या लेखकाविषयीं त्यांनीं अगदीं विचित्रच तर्क केला होता. 'रत्नाकर' या नांवाच्या पंडिताचा तो ग्रंथ असावा असें त्यांनीं तेथें विधान केलें आहे. वरील मराठी टीप जेव्हां आम्हांला पहावयास मिळाली त्यावेळीं रा. रा. चांदोरकर यांचें म्हणणें कसें चुकीचें आहे व त्यांच्या वाचनांत सांकेतिक लिपी उलगडतांना कोणत्या चुका झाल्या याची माहिती देणारा एक निबंध १–२ वर्षांपूर्वी मंडळासमोर आमच्याकडून वाचला गेला होता. आज मंडळापुढें वाचल्या जाणाऱ्या निबंधावरून व उपलब्ध झालेल्या लक्षणरत्नाकर या पोथीवरून आमचें त्यावेळचें म्हणणें कसें बरोबर आहे हें वाचकांच्या ध्यानांत येईल.

४ पोथी छापली असतां ५-६ पानांपलीकडे जाणार नाहीं इतका लहान हा संस्कृत ग्रंथ आहे. तरी 'लहान मूर्ति, पण थोर कीर्ति' अशी या पोथीची गत आहे. या ग्रंथांतील प्रतिपादन लक्षांत घेतल्यास महानुभावेतर पंडितांना देखील विचारणीय असा हा ग्रंथ आहे असें निःसंशय वाटतें. कोणत्याही ग्रंथाचा अर्थ लावीत असतां त्याकडे कसें पाहावें याची अभिनव दृष्टि या ग्रंथावरून वाच-कांना येईल.

५ आतांपर्यंत लक्षणरत्नाकराच्या तीन हस्तलिखित पोथ्या आम्हांस पहावयास मिळाल्या. त्यांपैकीं एक काश्मिरी वळणाच्या अक्षरांची असून सरळ संस्कृतांत लिहिली आहे. दुसऱ्या दोन पोथ्या सांकेतिक लिपींत आहेत. पण या तीनही पोथ्यांचे लेखक संस्कृतानभिज्ञ होते असें दिसतें. कारण भलतेच संधी करणें, चुकीचे संधी, सामासिकपद एक न लिहिणें, अशुद्ध रूपें लिहिणें, शब्द गाळणें, एका शब्दाऐवजीं भलताच शब्द लिहिणें, इत्यादि चुका त्यांत आढळून आल्यानें आरंभीं आरंभीं या पोथ्यांवरून स्पष्ट बोध होईना. या तीन पोथ्यांत जो मजकूर आढळतो, तसाच मजकूर दुसऱ्या दोन पोथ्यांत निराळ्याच एका प्रकरणा-

बरोबर आढळून आला. '**संतोषमुनिराजविरचिते पद्धतिज्ञानरत्नाकर-प्रकरणे इतरमतव्यावृत्तिस्वमतप्रवष्ठानिर्णयो नाम प्रथमो वादः**' या भागांत आरंभींचीं २-३ पानें म्हणजे लक्षणरत्नाकराचाच उतारा आहे. सारांश, अशा प्रकारें **पांच** हस्तलिखित पोथ्यांचा उपयोग प्रस्तुत शुद्ध पाठ तयार करण्याच्या कामीं झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

६ लक्षणरत्नाकरावरील मागें उल्लेखिलेल्या दोन्ही जुन्या मराठी टीपा जर आम्हांस उपलब्ध झाल्या नसत्या तर, वरील काम फारच अवघड झालें असतें असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. 'बत्तीस लक्षणाची टीप' याच्या तीन हस्तलिखित पोथ्या आम्हांस पाहाण्यास मिळाल्या व पंडित शारंगधर पुसदेकर यांच्या महाराष्ट्रीय टीपेची एकच हस्तलिखित प्रत उपलब्ध झाली. पुसदेकर यांच्या टीपेंत लक्षणरत्नाकर ग्रंथांतील व्याख्यांचा मराठी अनुवाद व उदाहरणांचे कांहीं उल्लेख स्पष्ट दिले आहेत. पण 'बत्तीस लक्षणाची टीप' हा ग्रंथ एकाद्या महाभाष्यासारखा आहे. अनुवाद, भूमिका, आक्षेप, परिहार, उपपत्ति, उदाहरणें या दृष्टीनें हें मराठी भाषेंतील महाभाष्य अप्रतिम आहे. याविषयीं माहिती पुढें एकाद्या प्रसंगीं वाचकांना सादर करितां येईल. या टीपेंतील वाचनामुळें विषय-प्रतिपादन स्पष्ट झाल्यानें, मूळ संस्कृत ग्रंथाचा शुद्ध पाठ करणें सुगम झालें. वरील दोन्ही टीपा जुन्या मराठींत असून त्या सांकेतिक लिपींत लिहिलेल्या आहेत.

७ कै. भावे, रा. देशपांडे इत्यादिकांनीं गोपाळ पंडिताविषयीं जी माहिती दिली त्याला आधार पुढील आख्यायिकेचा असावा असें वाटतें.

" गोपाळ पंडितां बोधु ॥ गोपाळ पंडित सातां मासां जन्मले : **चक्रपाणी** पीतया नाम : आजेया नाम अनंतकुची : भट : तेहीं आणुनि : गोसावियाचीए उसंगीए ( श्री सर्वज्ञ चक्रधर यांच्या ) घातले : मग : म्हणीतलें : जी जी : याचे डोळे उघडति ना : मग गोसावी म्हणीतलें : याचे चर्मचक्षु राहाति : ते ज्ञानचक्षु होति : इतुलेनि डोळे उघडीले : म्हणौनि : **पारमांडल्य** : ऐसें म्हणीतलें : मग थोर जाले : माहापंडित जाले : गोसावी बीजें केलेयां उपरि ( चक्रधरांच्या निर्याणा-नंतर, शके ११९४ ) मग भटो बासांपासौनि ( श्रीनागदेवाचार्य ) बोधु जाला : भटाचीए अविद्यमानी अनुसरले : हे **वरखेडाचे** : ॥ ४० ॥ : " ( नागदेव-चरित लीळा ४० ).

भद्रकार कामाइसीं पारमांडल्य वाग्वेधसंक्रमणें मुग्दलया मीषें गमन : वेधवंती नागदेवो भट : गुरू करणें ॥ भद्रकार कामाइसें तीयें **रामदेवरायाची राणी** : ( हा रामदेवराव जाधव इतिहासांत अजून अज्ञात आहे. महिकावतीची बखर व महानुभावी वाङ्मय यांत याचा उल्लेख आढळतो. 'पंचवार्तिक' प्रस्तावना पान १५ पहा. )

तीएचां सवाए लक्षाचा व्यापारू **गोपाळ पंडितासि** होता : कामाइसें सदा पुराण आइकितें असति : तेथ **आनोबा** ( गोपाळ पंडित ) : पुराणीकांसि आक्षेपु लाविती : ते पुराणिकासि न लोटेति : मग : कामाइसें आनो बासातें पुसति : तरि हें कैसें : हो : मग : आनो बास आक्षेप मोडणी सांगति : तें कामाइसाचेया प्रत्ययांसि ए : आणि चमत्करीति : आणि म्हणति : पंडीतो : हें तुम्ही केवि जाणा : ते म्हणति : आम्हां **गुरूमुख** असे : मग कामाइसीं पूसिलें : तुमचे गुरु कव्हणी ठाइं असत : आनो बासी म्हणीतलें : ना : ते : मुद्गलापासीला नींबां असति...... ॥ १६८ ॥ ( नागदेवचरित लीळा १६८ ).

" आनो बासीं **अंत्याक्षरीं** करणें : ॥ : एक वेळ आनो बासीं अंत्याक्षरी केली : अंतीं जें अक्षर तें पुढीला वाक्याचा आदि : ऐसीं बत्तीस वाक्यें केलीं :॥"

तया दृष्टांतादिक लक्षण कथन : ॥ : आनो बासीं केशो बासीं दृष्टांत संबंधिले तयांचीं लक्षणें : आणि : आणिक ही शास्त्रलक्षणें : ऐसीं संस्कृतें बोलिलीं:॥" ( वृद्धाचार लीळा १४–१५ ).

सारांश, गोपाळपंडितांची विद्वत्ता, त्यांचें नागदेवाचार्यांचें शिष्यत्व, पारमांडल्य नांव मिळण्याचें कारण, लक्षणरत्नाकर या संस्कृत ग्रंथाचें जनकत्व इत्यादि गोष्टींना परंपरेचा आधार कसा आहे हें स्पष्ट होईल. अशाच प्रकारची माहिती इतर महानुभावीय ग्रंथांत आहे, पण ती देऊन येथें विस्तार करीत नाहीं.

८ मागें उल्लेखिलेल्या मराठी टीपग्रंथांत " आनो बासीं लक्षणरत्नाकरीं लिहिलें " असे उल्लेख अनेक वेळां आले आहेत. श्री. पुसदेकर महानुभाव यांच्या टीपेंतील अवतरण या दृष्टीनें विशेष उल्लेखनीय वाटतें.

: श्रीपरेशाय नमः । अथ बत्तीस लक्षणाची टीका प्रारंभः ॥
श्रीचक्रेशकृपादृष्ट्या दृष्टं निर्णयमव्ययम् ।
परशास्त्रप्रमाणेन संक्षेपात् कथयामि तम् ॥ ( लक्षणरत्नाकरांतील आरंभीचा श्लोक ).

अहं तं निर्णयं प्रवदामि । इत्यन्वयः । अहं पारमांडल्यनामाचार्यः ( श्रीपंडित अनंतराज व्यासः) जो तो । तं तयातेः द्वात्रिंशल्लक्षणभेदें केला जो निर्णय तयातें: । **प्रवदामि**– बोलतों । कथंभूतं निर्णयम् ।कैसीया परीचेया निर्णयातें: । **श्रीचक्रेशकृपादृष्ट्या दृष्टं** : श्रीचक्रधराची जे कृपादृष्टि : म्हणजे : वरप्रदानिक : जे दृष्टि : तेया : वरप्रदानदृष्टीं करोनिः दृष्टं म्हणिजे देखिला : इत्यादि.

सारांश 'लक्षणरत्नाकर' हा ग्रंथ आणो बासानीं लिहिला व चक्रधरांची प्रेरणा किंवा चक्रधरांनीं केलेलें व नागदेवांच्या मुखद्वारें ऐकलेलें निरूपण या बाबतींत मार्गदर्शक झालें असें यावरून दिसतें. श्रीचक्रेशाच्या वरदानी कृपा-

दृष्टीमुळें मला प्रतिपाद्य विषयाचा निर्णय कळला, व तो त्यांच्याच प्रमाणांना धरून मी संक्षेपानें सांगतों असें आणो चास 'लक्षणरत्नाकराच्या' आरंभीं म्हणत आहेत. तसेंच मराठी टीपांमध्यें मधून मधून चक्रधरांच्या तोंडचीं अवतरणें दिलेलीं दिसतात. त्यावरून बत्तीस लक्षणांची मूळ कल्पना चक्रधरांची असून, त्यांचीं लक्षणें बांधणें त्यांचे पोटभेद दाखवणें व तसेंच चक्रधरांच्याच प्रमाणभूत सूत्र-वचनांवरून त्या लक्षणांचा उलगडा करणें हें काम गोपाळपंडितांनीं केलें असें वाटतें. म्हणून 'लक्षणरत्नाकर' हें बत्तीस लक्षणांसंबंधीं एक संस्कृतभाष्य आहे असें दिसतें.

९ प्रस्तुत ग्रंथाचा आरंभ पुढीलप्रमाणें आहे. "श्रीपरेशाय नमः । श्रीचक्रेश-कृपादृष्ट्या दृष्टं निर्णयमव्ययं । परशास्त्रप्रमाणेन संक्षेपात् कथयामि तम् ॥ १ ॥ अथ द्वात्रिंशल्लक्षणं शास्त्रम् । प्रतिज्ञा–प्रमाण–दृष्टान्त........प्रतीति–विशेषण–प्रतिष्ठाश्चेति द्वात्रिंशल्लक्षणानि ॥" ग्रंथाची समाप्ति पुढीलप्रमाणें झालेली आहे. "इति श्री पारमांडल्यनाथविरचित लक्षणरत्नाकरः समाप्तः ।" सारांश, प्रथमतः श्रीपरेशाला नमस्कार करून, त्यानंतर 'प्रतिज्ञा, प्रमाण' इत्यादि ३२ लक्षणें प्रथम उद्देश–मात्रें सांगून, मग त्या त्या लक्षणाची व्याख्या, उदाहरणें देऊन स्पष्ट केलेली आहे. हीं सर्व उदाहरणें, महानुभावपंथाचे आद्यप्रवर्तक श्री सर्वज्ञ चक्रधर यांच्या अमृतमयवाणींतून निघालेल्या सूत्रांतून घेतलेलीं आहेत. लीळाचरित्र, रत्नमालास्तोत्र, सिद्धान्तसूत्रें यांतील भाग उदाहरणासाठीं घेतला गेला आहे, त्यावरून लीळाचरित्र, रत्नमालास्तोत्र, सिद्धांतसूत्रपाठ यांच्या संकलनानंतर प्रस्तुत ग्रंथ झाला असावा असें वाटतें.

१० या बत्तीस लक्षणांची अगदीं स्थूल कल्पना, 'पंचवार्तिका'च्या शेवटच्या प्रकरणावरून (सूत्रस्वरूपलक्षण) करतां येण्याजोगी आहे. पण 'लक्षण-रत्नाकरा'चें खरें रहस्य त्याच्यावरील मराठी टीपग्रंथावरूनच कळतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे 'लक्षण–रत्नाकर' हें पांचवें वार्तिक होय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

११ सूत्रलक्षण, सूत्रप्रकृतिलक्षण, सूत्रकारकलक्षण, सूत्रव्याख्यान-लक्षण व सूत्रस्वरूपलक्षण अशीं हीं पांच वार्तिकें आहेत. पहिल्या वार्तिकांत 'अल्पाक्षरमसंदिग्धं' इत्यादि सूत्रलक्षण सांगून, सूत्र, वचन, वाक्य, महावाक्य इत्यादिकांचा विचार आलेला असतो. यामध्येंच शब्दांच्या जाती, लिंग-वचन, विभक्तिविचार, समास, संधि, प्रयोग, कृदन्तें व तद्धित यांचा अंतर्भाव होतो. दुसऱ्या वार्तिकांत, "संज्ञा च परिभाषा च विधिर्नियममेव च। अनिदेशोऽपवादश्च विभाषा च निपातनम् । प्रतिषेधोऽधिकारश्च सूत्रं च दशधा विदुः॥ अशाप्रकारें 'दशधा' सूत्रप्रकृति वर्णिलेली आहे. यावरून अमुक संज्ञासूत्र, अमुक

अतिदेश सूत्र, अमूक विधिसूत्र इत्यादि प्रकार स्पष्ट कळतात. तिसऱ्या वार्तिकांत कारकविचार स्पष्ट केलेला असतो. चवथ्या वार्तिकांत 'पद[1]च्छेदः पदा[2]र्थोक्तिः विग्रहो[3] वाक्ययोजना[4]। आक्षेपश्च[5] समाधानं[6] व्याख्यानं षड्विधं मतम्' अशा प्रकारें सूत्रव्याख्यानाचे सहा प्रकार स्पष्ट केलेले असतात. पांचव्या वार्तिकांत (सूत्र-स्वरूपलक्षण) यामध्यें सूत्रांच्या अंतर्गत असलेले अशेष विशेष भाव उमटविण्याचें कार्य केलेलें असतें. हीं लक्षणें एकंदर ३२ आहेत. तीं येणेंप्रमाणें—प्रतिज्ञा,[1] प्रमाण,[2] दृष्टांत,[3] उपपत्ति,[4] व्याप्ति,[5] विषयप्रदान,[6] विषयप्रबोधक,[7] उत्सर्ग,[8] अपवाद,[9] निषेध,[10] न्याय,[11] विरोधपरिहार,[12] काकु,[13] कक्षा,[14] भावार्थ,[15] प्रक-रण,[16] अस्तित्व,[17] निर्देश,[18] निर्णय,[19] पक्ष,[20] प्रभेद,[21] आशंका,[22] आक्षेप,[23] कार्य,[24] लक्षण,[25] स्वरूप,[26] कारण,[27] हेतु,[28] संबंध,[29] प्रतीति,[30] विशेषण,[31] प्रतिष्ठा.[32] 'प्रतिष्ठा' शब्दाबद्दल कांहीं पोथींत 'पद्धति' शब्द आहे. 'लक्षण-रत्नाकरांत' या पांचव्या वार्तिकांतील ३२ लक्षणें घेऊन, त्यांच्या व्याख्या, लक्षणांचे पोटभेद, व स्पष्टीकरण करणारीं उदाहरणें सांगितलेलीं आहेत.

१२ जुन्या मराठी टीपेंतील या संबंधींचा उतारा उद्‌बोधक असल्यानें पुढें देत आहे. "ईश्वरें श्रीचक्रधरें ब्रह्मविद्या निरूपिली : तीएचां ठाइं प्रथम सूत्रलक्षण बोलिलें : तदनंतरें सूत्रप्रकृतिलक्षण बोलिलें : तदनंतरें सूत्रकारकलक्षण बोलिलें : तदनंतरें सूत्रव्याख्यानलक्षण बोलिलें : ऐसें चतुर्विध वार्तिक अभ्यासलेयां सूत्र-स्वरूपलक्षण उमटे : तेणेंकरून सकळ सूत्राचें अशेष विशेष भाव उमटेति : म्हणौनि सूत्रस्वरूपाचें ज्ञान होआवेंचि लागे : ऐसेया सूत्रस्वरूपाचें लक्षण आनो-बासीं लक्षणरत्नाकरीं बोलिलें असे : " द्वात्रिंशल्लक्षणैर्गीतं स्वरूपं शास्त्रवेदिभिः। सूत्राणां तेन विज्ञानं संजायेत मनिषिणाम्॥ " एया कारणातवं सूत्रस्वरूपाचें ज्ञान तें होए : जें बत्तीसालक्षणाचें यथायथमेव व्याख्यान उमटे : तीए बत्तीसलक्षणें उद्देशमात्रें सांधिजतातिः (प्रमाण—प्रमेय.......इत्यादि) : ऐसीं बत्तीस लक्षणें पृथक पृथक लक्षणांवांचूनि आणि उदाहरणांवांचूनि प्रत्यया न एति : भणौनि प्रथम प्रतिज्ञासूत्र..." (बत्तीसा लक्षणाची टीप).

सारांश, चार वार्तिकांच्या अभ्यासानें भूमिका तयार झाल्यावर मग पांचव्या वार्तिकाची खरी इमारत उठूं शकते.

१३ पंचवार्तिकाचें महत्त्व काय हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल. महा-नुभावांचा शास्त्राभ्यास कसा चालत असे हें लक्ष्यांत येण्यास पुढील अवतरण अत्यंत उद्बोधक आहे. 'बत्तीस लक्षणाची टीप' या मराठी टीपेंतील 'निर्णय' या लक्षणाचा भाग चालूं असतां वर्णनाच्या ओघांत तो भाग आढळून येतो.

"आतां संप्रदायाख्य निर्णयः श्रवण : अभ्यास : मनन : निदिध्यासन : एहीं चौप्रकारीं जाणावा : जेणें शास्त्रें आत्महीत जोडे : तें वारंवार बुद्धिपूर्वक आइकी

जेः तेंः **श्रवण** :।: तेणें श्रवणें आत्महिता निर्णय जोडेः नसुधेनि शास्त्रश्रवणें संपूर्ण आत्महित न जोडे : म्हणौनि तयाचा अभ्यासु हो आवा :।: पुस्तकस्थितशास्त्र जिव्हाग्रीं धोकें करूनि पाठकीजे : तो **अभ्यास** : तेणें अभ्यासें आत्महिताचा निर्णय जोडे : कां पा : श्रवणाचेया अपेक्षा : अभ्यासें : अधिक : अज्ञान अन्यथाज्ञान : निवृत्ति होए : म्हणौनि नसुधेनि अभ्यासें संपूर्ण आत्महित न जोडे : म्हणौनि : तयाचें **मनन** हो आवें : अभ्यासिलें शास्त्र : वारंवार शब्दें पठण कीजे : तें **मनन** : तेणें मननें आत्महिताचा निर्णय जोडे : कां पा : आभ्यासाचेया अपेक्षा : मननें श्रुतार्थाचा उमट होए : आणि श्रवण मननाचिया आवृत्ति मनोरथांची गति कुंठे : तेणे इंद्रिया विराम उपजे म्हणौनि : नसुधिया मननें संपूर्ण आत्महित न जोडे : म्हणौनि : तयाचें निदिध्यासन होआवें : सूत्रांचा सरवळा : तथा वार्तिक : तथा लापिका : तथा भाष्य : तथा टीका : तथा टीपण : यां सां प्रकाराचा उमटे जो अभ्यास : आणि : **वार्तिक पंचकाचा अभ्यास : तें निदिध्यासन** : तेणें निदिध्यासनें आत्महिताचा निर्णय जोडे : कां पां : मननाचेया अपेक्षा : निदिध्यासनें श्रुताचा बहुसाल उमट होए : म्हणौनि : एवं संप्रदायाख्य निर्णयः ॥ "

१४ लक्षणरत्नाकरांतील कांहीं थोडा भाग पद्य असून बराचसा भाग गद्य आहे. पद्यभाग हा दुसऱ्या एकाद्या ग्रंथाचें अवतरण आहे किंवा आनोबासानीं स्वतःच केलेला आहे हें नक्की सांगतां येत नाहीं. दुसऱ्या एखाद्या संस्कृत ग्रंथांतील प्रसंगाला उपयोगी पडण्यासारखा भाग येथें घेतलेला असावा किंवा त्याचा अनुवाद येथें केला असावा. गद्य भाग आणोबासांचा आहे यांत प्रश्नच नाहीं. बत्तीस लक्षणांच्या नांवाकडे नजर फेकल्यास व श्रीचक्रधरांच्याकडून हीं बत्तीस लक्षणें महानुभावपरंपरेंत आलीं हें गृहीत धरल्यास संस्कृतांतील कोणता आदर्श श्रीचक्रधरांच्या पुढें अथवा आणोबासांच्या पुढें होता हा एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. चक्रधरांचें प्रयाण शक ११९४ मध्यें झालें, नागदेवाचार्य शक १२२४ मध्यें कालवश झाले. तेव्हां या काळांच्या पूर्वी झालेल्या ग्रंथांची छाप यावर पडावयास पाहिजे. 'प्रतिज्ञा प्रमाण दृष्टान्त' इत्यादि वाचूं लागल्याबरोबर, **तर्कभाषेंतील** "प्रमाण–प्रमेय–संशय–प्रयोजन" इत्यादिकांची आठवण होते; 'दृष्टांत, काकु, कक्षा, भावार्थ, प्रकरण,' इत्यादिकांवरून साहित्यशास्त्रांतील शब्दांची मालिका डोळ्यासमोर येते; 'विशेषण' 'अपवाद' या नांवांनीं व्याकरणाची आठवण होते. 'प्रतिज्ञा, प्रमाण, उत्सर्ग, आक्षेप,' इत्यादिकांमुळें पूर्वमीमांसा, नजरेसमोर येऊं लागते. तेव्हां हीं बत्तीस लक्षणें संकलित केलीं गेलीं, किंवा एखाद्या ग्रंथांन अशींच बत्तीस लक्षणें ओळीनें सांपडतात व तो ग्रंथ तेराव्या शतकांतील अगर अगोदरचा आहे कीं नाहीं, इत्यादि गोष्टींचा स्वतंत्र विचार करण्यासारखा प्रश्न आहे. हीं बत्तीस लक्षणें एखाद्या संस्कृतग्रंथांतील असोत किंवा निरनिराळ्या

संस्कृत ग्रंथांतून संकलित केलेलीं असोत, तथापि त्यांचा उपयोग, मराठींत अर्थनिर्णय करण्याच्यां कामीं ६०० वर्षांपूर्वी केलेला आढळतो ही एक महत्त्वाची व अभिमानाची बाब आहे; व अजून देखील याचें अनुकरण करणें इष्ट असेंच आहे. वरील प्रश्नाचा निर्णय नीट व्हावा म्हणून मूळ संस्कृत ग्रंथ जिज्ञासू वाचकासाठीं मंडळासमोर ठेवित आहे. हा संस्कृत ग्रंथ वाचून ज्यांना ज्या ज्या कल्पना सुचतील, त्या प्रस्तुत लेखकास कळविल्यास त्यांचा मी आभारी होईन; कारण तौलनिक अभ्यासाच्या दृष्टीनें त्याचा उपयोग होईल. त्या दृष्टीनें माझें वाचन चालू असून, नक्की असें कांहीं ठरविण्याची पूर्ण सामुग्री उपलब्ध न झाल्यामुळें हा प्रश्न सध्यां येथेंच थांबवूं.

१५ आतां या बत्तीस लक्षणांचा परस्परसंबंध काय याच्या विचाराकडे थोडें वळूं. उदाहरणार्थः पहिलें लक्षण प्रतिज्ञा हें आहे. 'वाक्कृतार्थ—कर्तृत्वशक्तिस्वरूपा प्रतिज्ञा" असें लक्षण **आनोबास** देतात. "वाक् कृतार्थ = आज्ञापानशक्तिवाचेचें : आज्ञेचें—करण : तल्लक्षणें जो अर्थ : निष्पत्ति प्रयोजनः आणि : कर्तृत्वशक्ति : स्वयं करणाचें सामर्थ्य आहे स्वरूपीं जीएचा : ते : प्रतिज्ञा : बोलिजे : म्हणिजे : **ऐश्वर्य-कर्तृत्व धर्मरूप निष्ठा** :" अशा प्रकारचें स्पष्टीकरण श्रीशारंगधर महानुभाव आपल्या मराठी टीपेंत देतात. पंडित भीष्माचार्य आपल्या 'पंचवार्तिकांत' पुढील प्रमाणें अर्थ देतात;" फलश्रुतिज्ञापक वाक्यातें प्रतिज्ञासूत्र बोलिजे : यथा : विकार-*विकल्पशून्य : स्वभावमात्रें : निरालंबी : देवतास्मरणें : जो जन्म क्षेपी : तेयासि : परमेश्वरू : आपुला संबंध देति : एथ : अनुसरलेया आचारवंतासि जन्म क्षेपलेया नंतरें : परमेश्वरू पुनरपि आपुला संबंध देति : ही फलश्रुति असे : म्हणौनि यातें प्रतिज्ञासूत्र बोलीजे :" ; "बत्तीसलक्षणाच्या" टीकेंत पुढील निरूपण आहे. "जीवातें साधनीं प्रवर्तावया साध्य फलश्रुति प्रथम बोलावीचि लागे : म्हणौनि प्रथम प्रतिज्ञासूत्र : फलश्रुतिज्ञापक आणि स्वसामर्थ्यद्योतक जें वाक्य : त्यें : प्रतिज्ञा-सूत्र बोलीजे :"

सारांश कोणत्याही महत्त्वाच्या पुस्तकांत त्याकडे वाचकांचें लक्ष जावें म्हणून व तें पुस्तक वाचलें असतां 'फलश्रुति' काय तें सांगणारीं वाक्यें असतात, अशा प्रकारचीं फळें ऐकून व आपणाला प्राप्त व्हावीं असा उद्देश मनांत येऊन वाचकांचें मन त्याकडे प्रवृत्त करण्याचें काम अशा वाक्यांकडे असतें. वाचकांच्या मनांत एक प्रकारची अपूर्व श्रद्धा उत्पन्न करून, तें सांगितलेलें साधन अनुसरलें असतां, इष्ट फलप्राप्ति होईल असा निर्वाळा उत्पन्न करणें हें प्रतिसूत्राचें काम आहे. उदाहरणार्थ, गीतेमधील 'सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज। अहं त्वां सर्व-

---

* हें सिद्धान्तसूत्रपाठांतील 'अस्तीपरि' प्रकरणांचें सूत्र आहे. (चक्रधर सिद्धांत सूत्रें पान १३-१४ पहा).

पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।' हें वाक्य प्रतिज्ञासूत्र होईल. सर्व धर्म सोडून तूं माझ्याकडे ये, मी सर्व पापापासून तुला मुक्त करतों; दुःख करूं नकोस अशी, जणु काय, प्रतिज्ञा या श्लोकांत आहे. दासबोधाच्या आरंभीं असेंच दिसून येईल. " आळसी तेचि साक्षपी होती । पापी तेचि परस्तावती । निंदक तेचि वंदु लागती । भक्तिमार्गासि ॥ नाना धोके देहबुद्धीचे । नाना किंत संदेहाचे । नाना उद्वेग संसाराचे । नासती श्रवणें ॥ " अशा प्रकारच्या ओव्या, दासबोध वाचण्यास श्रोत्यांना प्रेरित करावें म्हणून आहेत. त्या वाचून हा ग्रंथ काय आहे, आपल्याला तें फळ मिळेल कां ! अशा आशेनें ग्रंथवाचनाची भूक उत्पन्न केली जाते. ज्ञानेश्वरांचा ' प्रतीज्ञोत्तर ' या शब्दाची योजना त्याच अर्थानें आहे. " तरि अवधान एकलें देइजे : मग सर्व सुखासि पात्र होइजे : हें प्रतिज्ञोत्तर माझें । उघड आइका ॥ " अध्याय ९ " माझा मऱ्हाटाचि बोल कवतिकें । परि अमृतातें हि पैजेंसीं जिंके । ऐसीं अक्षरेंचि रसिकें मेळवीन ॥" अ० ६ ॥ अशा प्रकारें ' प्रतिज्ञा ' सूत्राचें कार्य, तें वाचकांच्या लक्षांत येइलच. ' प्रतीज्ञे ' नंतर प्रमाण. कारण, आप्तवाक्य कोणाचें मानावयाचें ? गीतेमध्यें ' श्रीकृष्णोक्ति ' हें प्रमाण; तसेंच महानुभावांना प्रमाण ' श्रीसर्वज्ञचक्रधरा'चें म्हणणें. म्हणून ' परेण उक्तं प्रमाणं च सर्वबुद्धेरगोचरम् ' असें आनोबास म्हणतात. पण प्रमाण समजण्यासाठीं दृष्टांताची योजना; " येन दृष्टः प्रमेयान्तः तं दृष्टान्तं प्रचक्षते " असें दृष्टांतलक्षण यासाठीं केलें. इतकें झालें तरी, अमक्या गोष्टीचें फळ अमूक, अमक्याचें अमूक असा श्रुतीचा अर्थ कळण्यासाठीं ' उपपत्ति ' पाहिजे. यानंतर व्यावृत्तिसूत्र. म्हणजे दृष्टांतांतील सादृश्यामुळें सामान्य पदार्थाच्या ठिकाणीं विशेष बुद्धि उत्पन्न होण्याचा संभव असतो तो टाळण्यासाठीं या लक्षणाचा उपयोग आहे. उदाहरणार्थ पुढील सूत्रें पहा. केवळ ' देवता ' शब्दामुळें परमेश्वर व देवता हें एकच असा भ्रम कोणाला उत्पन्न झाल्यास, श्रीचक्रधर म्हणतात, " कर्मभूमीचिया देवता होति : परि : परमेश्वरू नव्हेति : अष्टौ देवयोनी देवता होति : परि : परमेश्वरू नव्हेति : " ( चक्रधर सूत्रें, पान २ पहा ). इतर देवतांच्या ठिकाणीं कांहीं कारणानें परमेश्वरबुद्धि दृष्टांतामुळें उत्पन्न होण्याचा संभव असतो, अशा वेळीं त्याचें परिहरण करण्यासाठीं, व्यावृत्तिसूत्र असतें. प्रमाणसूत्रांपैकीं महत्त्वाचें कोणतें, कमी महत्त्वाचें कोणतें हा सारासार विवेक ज्या सूत्रावरून कळतो तें विषयप्रदानसूत्र. अशा प्रकारें बत्तीस लक्षणांचा वाढता विकास ध्यानांत घेतल्यास या लहानशा पोथीचें महत्त्व ध्यानांत येईल. पोथीची नक्कल मंडळाजवळ दिली असल्यानें ती पाहून वाचकांना सावकाश विचार करितां येईल. सर्वच लक्षणांची माहिती सांगून आपला वेळ घेत नाहीं. पोथीचा विषय व त्याचें महत्त्व वाचकांच्या नजरेस आलें म्हणजे या निबंधाचें कार्य झालें.

१६ शेवटीं श्री सर्वज्ञ चक्रधर यांनीं अशा प्रकारच्या लक्षणांची भूमिका आपल्या निरूपणानें तयार केली असावी, या तर्काला कांहीं प्रमाणें देऊन हा निबंध

संपवूं. ' निषेध ' ह्या लक्षणाचें विवरण चालूं असतां, निषेधाचे भेद तेरा सांगितलेले आहेत. मराठी टीपेंत ' परमहंसस्मृति ' यांतील पुढील उतारा देऊन त्याअर्थी चक्रधरोक्त सूत्रें दिलेलीं आहेत.

" हिंसार्थो द्रव्ययन्त्रान्यकथनमथवा पात्रनैरोधकं च ।
पंक्तौ वैषम्यचर्या सदधिकघटनं देवतक्षोभ एव ।
दत्तार्थस्यांगिकारो परभजनविधिर्दातुवांछाव्यपायः ।
पात्राणां वैपरित्यं ग्रहणमनुचितं भोगिनां वै निषेधः ॥ १ ॥ "

चक्रधरांच्या सूत्रपाठांत पुढील सूत्रें तेंच सांगतात.

" हिंसा न करावी ॥ १ ॥ विकल्पु स्फुरे तो अर्थु न कीजे. ॥ २ ॥ विकारविखो न सेवावा ॥ ३ ॥ गुरुपासि अधीक वृत्ति न वर्तावें ॥ ४ ॥ प्रमाद चूकविजे ॥ ५ ॥ आपण कव्हणाची तांति न कीजे ॥ ६ ॥ ईश्वराची प्रवृत्ति भंगो नेदावी : परमेश्वरपरायणाची वृत्ति भंगो नेदावी : ॥ ७ ॥ द्रव्यसंबंधा साक्षी न ठाकावें ॥ ८ ॥ क्रय विक्रय न करावें ॥ ९ ॥ छेद भेद न करावा ॥ १० ॥ यात्रे क्षेत्रां न वचावें ॥ ११ ॥ ईषणत्रय त्यजावें ॥ १२ ॥ कव्हणाचा करवावो धर्मस्पर्शु न कीजे ॥ १३ ॥ अशा प्रकारें १३ प्रकारचे निषेध त्यानीं वर्णिले आहेत.

तसेंच ' हेतु ' या २८ व्या लक्षणांत ' नव हेतवः । ' असें सांगितलें आहे. याविषयीं टीपकार म्हणतात. " उपधर्मोऽभिमानदाक्षिण्यं स्नेहकार्यं भयं यशः । उपकारोऽनुकंपा च रामस्यं नव हेतवः । " ह्या श्लोक सहेतुक भूतभजनांचा प्रकरणीं परमेश्वरें ( श्रीचक्रधरें ) उच्चारिला.

वरील दोन उदाहरणांवरून श्रीचक्रधरांच्या प्रसंगोपात्त निरूपणावरून प्रस्तुत प्रकारच्या ग्रंथाची भूमिका कशी तयार झाली असावी याची कल्पना येईल.

१७. अशा प्रकारें ' अर्थनिर्णयशास्त्र ' दृष्टीनें या ग्रंथाचें महत्त्व अजूनही कमी झालें नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. तसेंच महानुभावीय पंथांत व्याकरणविषयक ग्रंथ होते की नाहीं, अशा प्रकारचा संशय प्रो. कोलते यांच्या 'भानुभट बोरीकर' या पुस्तकावरून व पुणें येथील व्याख्यानांवरून उत्पन्न झाला असल्यास पंचवार्तिक व लक्षणरत्नाकर हे दोन ग्रंथ तरी त्याचें थोडेसें परिहरण करतील अशी आशा आहे. वरील ग्रंथांचा नुसता उल्लेख सांपडतो असें नव्हे, किंवा कोणी महंतांनीं कांहींतरी उतरून आणून दिलें म्हणून नव्हे, तर प्रत्यक्ष एकच प्रत नव्हे तर जास्ती—पोथ्या पाहून—वाचकांपुढें माहिती सादर केलेली आहे.

## ॥ लक्षणरत्नाकरः ॥

श्रीपरेशाय नमः

श्रीचक्रेशकृपादृष्ट्या दृष्टं निर्णयमव्ययम् ।
परशास्त्रप्रमाणेन संक्षेपात् कथयामि तम् ॥ १

अल्पाक्षरमसंदिग्धं सारवद्विश्वतोमुखं ।
अस्तोभमनवद्यं च सूत्रं सूत्रविदो विदुः ॥ २ ॥
द्वात्रिंशल्लक्षणैर्गीतं स्वरूपं शास्त्रवेदिभिः ।
सूत्राणां तेन विज्ञानं संजायेत मनीषिणाम् ॥ ३ ॥

अथ द्वात्रिंशल्लक्षणं शास्त्रं ॥ प्रतिज्ञा[१] प्रमाण[२] दृष्टान्त[३]ोपपत्ति[४] व्यावृत्ति[५] विषयप्रदानत्व[६] विशेष[७]प्रबोधत्वो[८]त्सर्गापवाद[९] निषेध[१०] न्याय[११] विरोध[१२] परिहार[१३] काकादिचतुष्टयास्तित्व[१४,१५,१६,१७,१८] निर्देश[१९] निर्णय[२०] पक्षप्रभेदाशंकाक्षेप[२१,२२,२३] कार्य[२४] लक्षण[२५] स्वरूप[२६] कारण[२७] हेतु[२८] संबंध[२९] प्रतीति[३०] विशेषण[३१] प्रतिष्ठाश्चेति द्वात्रिंशल्लक्षणानि ॥

वाक्कृतार्थकर्तृत्वशक्तिस्वरूपा प्रतिज्ञा । सा द्विधा । स्वशक्तिस्वरूपान्यशक्तिस्वरूपा च । स्वशक्तिस्वरूपा जीवाविद्याविभागप्रमाणेन । सर्वास्तित्वप्रमाणेन सर्वसामर्थ्यप्रमाणेन ॥ अन्यशक्तिस्वरूपार्जुनेन जयद्रथवधः । ध्वजास्तंभानयनादि ॥ अद्वैतसमर्थनादीन्युदाहरणानि ॥ द्वितीयं देवतासामर्थ्यसिद्ध्युदाहरणानि । तथा परसत्तया फलभोगादिशक्तिव्यापारः ॥ १ ॥

श्रुतं यथास्ति तथा येन ज्ञेयं तज्ज्ञानम् । सर्वप्रमातृत्व सर्वज्ञत्व युक्तस्वरूपादीश्वरात्सम्यगनुभवसाधनोपकारकं ब्रह्मविद्याख्यं प्रमाणं तत् त्रिविधं । श्रुति[१] स्मृति[२] वृद्धाचार[३] निर्णयाख्यम् । परेणोक्तं प्रमाणं च सर्वबुद्धेरगोचरं ॥ २ ॥

येन दृष्टः प्रमेयान्तस्तं दृष्टान्तं प्रक्षचते ॥
अंशग्राह्यः[१] समग्रांशो[२]ऽन्वयो[३]ऽप्रत्यन्वयस्तथा[४] ।
वास्तवो[५] योगजोर्थेषु[६] दृष्टान्तः षड्विधः स्मृतः ॥

आद्या अंशग्राह्याः सप्त ॥ समग्रांशाश्छुरिकादयः ॥ खाद्यादयोऽन्वयाः ॥ अप्रत्यन्वयो दुर्बलाख्यादयः ॥ योगजाः समुद्रवज्राकराद्याः । वास्तवाः शर्करादयः । अंशाद्ग्राह्योंऽशग्राह्यः । समग्रैरंशैर्ग्राह्यः समग्रांशः ॥ अपरपूर्वप्रकृतिसंबन्धरूपोऽन्वयः ॥ येषां परस्परं संबंधो न विद्यते व्यतिक्रमेण ग्राह्योऽप्रत्यन्वयः ॥ योगजो व्यक्ताव्यक्त संबंधग्राह्यः ॥ प्रत्यक्षानुभवाद् ग्राह्या गुणजातिक्रियादिभिः ॥ ३ ॥

उपपाद्य समोक्ता च सोपपत्तिस्तदोच्यते ।
कार्यजा लाक्षणीका च वास्तवा कारणानुजा ।
चतुर्विधा सोपपत्तिः प्रवदन्ति मनीषिणः ॥
कार्यजा[१] कार्यरूपा च लाक्षणीका[२] च लक्षणात् ।
वास्तवा[३] च स्वरूपाख्या कारणात् कारणानुजा[४] ॥

अथोदाहरणम् । यथा सत्राजितकुमार्या श्रीकृष्णनाथेन वैदर्भीं विलयदर्शनात् कृता सोपपत्तिः कार्यजा[१] ॥ यथा शस्त्रसमूहयुक्तः शौर्यकार्यप्रसंगेन शस्त्रं दधाति । यथा समयोचतरजिव्यापारः । ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्राणां कार्यभेदेनोपपत्तिः । स्वसामर्थ्यान्महात्मनः प्रसंगेन । बहुरत्नेतिवचनाल्लाक्षाणिकोपपत्तिः[२] । कस्यचिद्द्विजस्य प्रदीपमनोरथात् स्वयंप्रकाशदर्शनेन वास्तवोपपत्तिः[३] । यथोदरस्थं मुखादिना ज्ञेयं बीजांकुरवत् । इति कारणानुज्ञोपपत्तिः[४] ॥ ४ ॥

यथार्थज्ञानेन सामान्ये यया विशेषबुद्धिर्निरस्ता सा व्यावृत्तिः । सा पंचविधा । कर्म[१] कर्मफलोपभोग[२ ३] कर्मफलस्थाधिष्ठानरूपेण[४ ५] । अस्य लक्षणं सिद्धान्तसूत्रेण ज्ञेयम् ॥ ५ ॥

परशास्त्रेण सर्वेषां शास्त्राणां सारग्रहणं विषयप्रदानत्वम् । तद्द्विविधम् । यथाज्ञानादन्यथाज्ञानाच्च । गजदृष्टांतेन यथात्वम् । परिणामविवर्तन्यायेनान्यथात्वम् ॥ ६ ॥

सामान्यहेयोपादेय विभागपरमात्राऽपभ्रमातीतत्वाद्यथाप्रकाशस्वरूपं विशेषतो ज्ञानेन ज्ञेयं तद् विशेषप्रबोधत्वम् ॥ तद्द्विविधम् । शाब्दज्ञानादपरोक्षज्ञानाच्च । ज्ञानद्वयलक्षणं सिद्धान्तसूत्रेण ज्ञेयम् ॥ ७ ॥

उदित्यतिशयेनार्थमात्रस्योत्सर्जनमुत्सर्गः । स द्विविधः । आक्षेपः परिहारश्चेति । यथा रत्नमालायां भववारणप्रहरणमिति विशेषेण पदेऽन्तरे तत्कार्यं न विद्यत इत्युत्सर्गवचनम् । परिहार दातृत्वसमयोत्सर्गोऽप्यस्ति घृतमनिष्टमित्युक्तं वाक्यग्रहणपरिहारे ॥ ८ ॥

उत्सर्गस्य निन्दाऽपवादः । स द्विविधः । प्रतिबाध्यः प्रतिष्ठास्वरूपश्च कथमवरावतारे भववारणप्रहरणमिति प्रतिबाधः । परप्रवृत्या युष्माकं समस्तमिष्टमिति प्रतिष्ठास्वरूपश्च ॥ ९ ॥

यो न कदापि सेव्यः स निषेधः । स त्रयोदशभेदवान् । ज्ञातव्यः परसिद्धान्तसूत्रेण ॥ १० ॥

काम्यविवादपरिहारप्रचुरो न्यायः । स त्रिविधः । नियमनिर्णयक्रियाभेदेन नितरामतिशयेन व्यवस्थाश्रितो नियमः । सोऽपि त्रिविधः । सत्ताशास्त्र शिक्षापणरूपेण देवतानां कर्मणां जीवानां चैतैरेव भेदैर्नियमोदाहरणम् ॥ यद्यथा तत्तथा निर्णितं निर्णयः । निर्णयप्रकरणेन ज्ञेयः क्रियमाणा क्रिया तस्यां विधेर्नियमः स च क्रियानियमः । मात्रतयोदाहरणम् ॥ ११ ॥

उत्सर्गापवादद्वयोगेन विरोधपरिहरणं विरोधपरिहारः स्वयुक्त्या करणीयमकरणीयं च । परप्रवृत्या करणीयमकरणीयं च । उमाम्बिकायामु-

दाहरणं तथाऽर्जुनस्य न्यायः ॥ स च विरोधपरिहारो द्विविधः । आचारपरो विचारपरश्च । पूर्वोदाहरणादाचारपरः । विचारपरो निर्वचनसमाप्तौ संबंध-वचनेनोदाहरणात् ॥ १२ ॥

शब्दोत्सर्गादन्यथाकरणोक्तः काकुः। यथा सामान्याभ्यर्थनेन निमन्त्र-णेनोक्तं द्वितीयं वैश्यगृहपरिहासम् ॥ १३ ॥

अन्यपदार्थस्यान्यशब्देन गूढोपभाषणं कक्षा । अत्र साध्वीन्यायो दाहरणम् ॥ १४ ॥

प्रवृत्तिशब्दनिर्मितफलानुवादविपरीतो भावः । प्रभासप्रशंसाप्रसंगेनो दाहरणम् ॥ १५ ॥

अनेका शब्दशब्दार्थाः समयोक्ताः प्रसंगतः । विजानीयाद् प्रकरणेन सर्वधर्मप्रशु(शू)न्यवत् ॥ यथा सौवर्णं वाच्यं धातुत्वाद् पदार्थवर्णविशेषत्वात् प्रकरणेन ज्ञेयम् । पुनः काक्कादि त्रयं प्रकरणाज्ज्ञेयम् ॥ १६ ॥

सद्भावमात्रमनुमानवाच्यमस्तित्वम् । तद् द्विविधम् । परोक्षे मत्परोक्षो-दाहरणम् । यथा वेदादीनि प्रमाणानि । अपरोक्षपक्षे विभावरिसमये यथा भोजराजेन दृष्टम् । तत्र ज्ञानोपायोऽस्ति । सयुक्त्या परोक्त्या च सामर्थ्या-द्वतरणमपरोक्षम् । परोक्तिं विना न ज्ञेयमित्युदाहरणम् ॥ १७ ॥

निःशेषेण शब्दद्वारास्थानविभागो निर्देशः । स च पंचधा ज्ञेयः । पुरुष[1] स्थान[2] वचना[3]धिकृत[4]चरित्ररूपेण[5] । परसूत्रेणोदाहरणम् ॥ १८ ॥

निश्चयार्थो निर्णयः । स त्रिविधः । शब्द[1]संप्रदाया[2]र्थरहस्याख्यः । शब्दाख्यो व्याकरणा[1]भिधान[2]छंदोऽलंकारसंगीतादिशास्त्रैः । संप्रदायाख्यः श्रवणमननिदिध्यासनैः । ( सद्गुरु—आस्येन ) सद्गुर्वास्येन ॥ १९ ॥

शब्दगति—प्रतिवादग्रहण स्वरूप पक्षः । स च त्रिविधः । पूर्वपक्षः परपक्षोऽन्यपक्षश्चेति । सिद्धान्तार्थग्रहणप्रयोजनाय पूर्वपक्षग्रहणम् । यथा परिणामविवर्तौ ज्ञात्वा ततो व्यावृत्तिरित्युदाहरणम् । परपक्षः सिद्धान्तपक्षः । प्रपंचस्वतन्त्रप्रमाणेनोदाहरणम् स्थलान्तराभिधानोऽन्यपक्षः । स्थलच्युतित्वात् स्थलान्तरगतानां म्हायिभटानां सुरभाषयोपन्यासात् स्थलप(प्र)तिष्ठाकरण-मित्युदाहरणम् ॥ २० ॥

द्विधार्थः प्रभेदः । स द्विविधः । स्वारूपिक औपाधिकश्चेति । स्वरूपेण भेदः स्वारूपिकः । दिकालयोरुदाहरणम् । द्वितीयं स्पर्शदृष्टांतेन । उपाधिना भेद(दः) । औपाधिकः । चौलमंजिष्ठादीन्युदाहरणानि । परेणोक्तानि ॥ २१ ॥

अर्थनिर्णयप्रयोजनायोपपत्याऽऽक्षेप आशंका । सा द्विधा । वास्त-[1] वोत्सर्ग[2] रूपा च । अन्यथार्थप्रतिबाधिनी वास्तवा । यथार्थनिर्णयप्रयो जनेनोक्ता उत्सर्गरूपा । परसूत्रेणोदाहरणम् ।

अन्यथार्थप्रतिबाधक आक्षेपः । स द्विधः । स्थलग्राहकः स्थलो-च्छेदकारकश्च । स्थलग्राहकप्रक्षे परस्परमथनमित्युदाहरणम् । स्थलोच्छेके स्थलस्य ग्रहणं ' नित्यादीनि कर्मणि मोक्षसाधनानि न भवन्ति ' इत्युदा-हरणम् ॥ २३ ॥

कारणोद्भवं कार्यम् । तद् द्विविधम् । अंगं प्रधानं च । यथा श्रीकृष्णा-वतारे जीवोद्धरणं भूभारहरणं च ॥ २४ ॥

लक्ष्यते वस्तु येन तल्लक्षणम् । तद् द्विविधम् । गौणं वास्तवं च । गौणं साजात्यवैजात्यावबोधाल्लक्ष्यमाणम् । वास्तवं यथा नित्यमुक्तप्रमाण-मित्युदाहरणम् ॥ २५ ॥

स्वयमेवरूपं स्वरूपम् । तच्चतुर्विधम् । सद्गुणं[1] विमलं[2] चेतिसमलं[3] भिन्न[4]-मुच्यते । चतुर्विधम् । स्वरूपं ज मलिनंसमलामलम् । परसूत्रेणोदाहरणम्॥२६॥

कार्योद्भवं कारणम् । तच्चतुर्विधम् । हेतु[1] कर्तृत्व[2] बीज[3] निमित्त[4] भेदेन । उदाहरणं लक्षणभेदाः परसूत्रेण बोधव्याः ॥ २७ ॥

काम्यार्थनिवार्जितपरोपकारप्रवृत्ताऽलिप्तत्वाद् हेतुः । द्वितीयः काम्य-स्वरूपं लेपयुक्तो हेतुः । यथा सृष्टिस्थितिसंहारजीवोद्धरणहेतौ परेशस्य नोपकारः केनाऽपि राज्ञा कानने वापी[1] कूप[2] तडागो[3] दका[4] लयानि कृतानि तत्र हेतुरस्य च सोऽपि नवविधो हेतुः परसूत्रेण ज्ञातव्यः ॥ २८ ॥

सम्यक् प्रकारेण परस्परान्वयैकरूपः संबंधः । स पंचविधः । परसूत्रेण ज्ञातव्यः ॥ २९ ॥

यथार्थनिश्चया प्रतीतिः । सा त्रिविधा । आत्म[1] शास्त्र[2] गुरु[3] भेदेन । परसूत्रेणोदाहरणम् ॥ ३० ॥

येन विशिष्यते तद्विशेषणम् । तत् त्रिविधम् । स्वरूपस्थं[1] यौगिक-[2] मुभयरूपं च । अव्यक्तामूर्तादिविशेषैर्ज्ञेयं । स्वरूपस्थम् । शक्ति विशेषैर्यौगि-कम् । उभयरूपं परमेश्वरावतारोस्तुतौ भाव्यं । यथा उभयदर्शिनः परमेश्वरा-वतारस्य सुरसिद्धपन्नगर्षयो ज्ञानिनो भक्तजनाश्च नित्यं स्तवनं कुर्वन्ति ॥३१॥

सर्वस्यापरस्य व्यावृत्या सर्वशास्त्रविषयप्रदानचतुरेण श्रीनागार्जुनेन परमेश्वरप्रसादार्तजनहृदये ब्रह्मविद्यायां प्रतिष्ठितः परधर्मः प्रतिष्ठा ॥ ३२ ॥

इति श्रीपारमांडल्यनाथविरचित लक्षणरत्नाकरः समाप्तः ॥ शुभमस्तु ॥

## भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-पुरस्कृत-ग्रंथमाला

(१) मठगांवचा शिलालेख आणि ब्राह्मण सामंत राजवंश (पृ. २४३–रा. य. वा. अ. यांवर्डेकर. रु. २ व रु. १०१४)
(२) पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् (मूळ व भाषांतर)=शिवाजीची पन्हाळ्यावरील स्वारी (पृ. ५०–स. म. दिवेकर. रु. ०१० व ०८)
(३) श्री शिवभारत (कवींद्र परमानन्दकृत) मूळ व मराठी भाषांतर (पृ. ५८९) –स. म. दिवेकर. रु. ६ व ५०१२)
(४) शिवचरित्रप्रदीप (पृ. ३२५– द. वि. आपटे. व स. म. दिवेकर, कागदी व कापडी. रु. ३॥ व ४ आणि रु. ३। व ३॥)
(५) हिंदी शिल्पशास्त्र भाग १ ला. (पृ. २००–कै. रा. सा. रु.वि.वझे रु.३ व रु.२)
(६) शिवकालीन जंत्री शके १५५१–१६५० (पृ. २००–कै. ग. स. खरे रु. ५)
(७) साधन–चिकित्सा (पृ. ३२०–वा. सि. बेन्द्रे. रु. ३॥ व रु. ३)
(८) ऐतिहासिक पोवाडे (पृ. ६१५–य. न केळकर. रु. ३ व रु. २॥)
(९) वाठारकर निंबाळकर–इतिहास (पृ. ३०० रु. १॥ व १०३०३)
(१०) भूतेश–आख्यान (पृ. ७५ ०१२ व ०१०)
(११) कऱ्हाड, (पृ. ५४–श्री. य. रा. गुमे, बी. ए ०८)
(१२) ऐतिहासिक प्रस्तावना (पृ० ६००–कै. वि. का. राजवाडे रु. ३ व २०६ ०६)
(१३) राजवाडे यांचे संकीर्ण निबंध (पृ. २९१ श्री. शं. ना. जोशी रु. २ रु.१॥)
(१४) राजवाडे संकीर्ण निबंध भाग ३ रा. (पृ. २८० श्री. शं.ना.जोशी १व२०१४)
(१५) पुरंदरे–दप्तर, भाग २ रा. उत्तर पेशवाईतील पत्रव्यवहार (रु. ३ व रु. २॥)
(१६) The Deliverance or the Escape of Shivaji the Great from Agra (R. S. G. K. Deshpande रु. ३ व रु. २॥)
(१७) लोककथा, पुस्तक १ लें (शं. ग. दाते कापडी कागदी रु.१॥ व रु.१, १। व ०१४)
(१८) पानसे घराण्याचा इतिहास (कै. रा. ब. पानसे रु. ३ व रु. २॥)
(१९) कै. वासुदेवशास्त्री खरे–चरित्र (दा. मो. भट रु. २॥ व रु. २।०)
(२०) लोककथा भाग२रा. (पृ.८०–श्री. शं.ग. दाते रु.१०८ व १०४ व १०४व०१४)
(२१) संपूर्ण भूषण (पृ. २३०–श्री. रा. गो. काटे–रु. १०८ व १०४)
(२२) शिवचरित्रसाहित्य खंड ३ रा (पृ. २८२–श्री. शं. ना. जोशी व श्री ग. ह. खरे रु. ३ व रु. २०८).
(२३) राजधानी रायगड (पृ. १६४–श्री. वि. वा. जोशी रु. १ व ०१२)
(२४) Shivaji the Founder of Maratha Svaraja (pp. 410 –C. V. Vaidya Rs. 3 and Rs. 2–8–0)
(२५) आळंदी (पृ. २०–श्री. ग. ह. खरे ०२)
(२६) मठगांवचा शिलालेख आणि कुडाळप्रांताचा प्राचीन इतिहास (पृ. १६५– अ. ब. वालावलकर रु. १०२ व ०१२)
(२७) पुरंदरे दप्तर भाग ३ रा (पृ. २५०–श्री. कृ. वा. पुरंदरे ३ रु. व रु. २०८)
(२८) मध्वमुनीश्वराची कविता (पृ. २५८–श्री. कं. प्र. त्र्यं. गुप्ती ३ व २०८)
(२९) मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमा (पृ. ९०–श्री. वि. गो. दिघे रु. १ व ०१२)
(३०) वेदस्तुति आणि स्फुट कविता (कृष्णदयार्णवकृत)–(किं. ०१२ व ०१०)
(३१) ज्ञानप्रदीप (पृ. १२५–प्रो. द. वा. पोतदार रु. १ व ०१२)

रा. रा. **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं आर्यभूषण छापखाना, घ. नं.
९३६।३ भांबुर्डा येथें छापलें व रा. रा. **दत्तो वामन पोतदार**
आणि रा. रा. **गंगाधरराव नारायणराव मुजुमदार**
यांनीं ३१३।२ सदाशिव पेठ, पुणें येथें प्रसिद्ध केलें.

# भारत–इतिहास–संशोधक–मंडळ–स्वीय–ग्रंथमाला

* अशी खूण केलेले ग्रंथ मुंबई सरकारानें प्राथमिक व दुय्यम शाळांच्या पुस्तकालयासाठीं मंजूर केले आहेत.

| अनुक्रम | किंमत रु. |
|---|---|
| १ अहवाल ( शके १८३२ ) | ३ |
| २ „ ( शके १८३३ ) | ५ |
| +३ मुग्रंत विचार(कै.वि.का.राजवाडे) | १० |
| ४ वार्षिक इतिवृत्त ( शके १८३४ ) | ५ |
| ५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (कै.वि.का.राजवाडे) | १।८ |
| *६ प्रथम संमेलन वृत्त (शके १८३५) | ।१२ |
| *७ वार्षिक इतिवृत्त ( शके १८३५ ) | ६ |
| *८ द्वितीय संमेलन वृत्त ( शके १८३६ ) | ३ |
| *९ वार्षिक इतिवृत्त ( शके १८३६ ) | ३ |
| *१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० ( शिवकालीन घराणीं ) | ३ |
| *११ वार्षिक इतिवृत्त (शके १८३७) | ६ |
| *१२ तृतीय संमेलन वृत्त (शके १८३७) | ३ |
| *१३ मुकुंद–महाभाष्यं ( संस्कृत ) | ।८ |
| *१४ ग्रंथराज ( दासोपंत ) | ।८ |
| *१५ स्फुट प्रकरणें भाग १ ला | ।१२ |
| *१६ स्फुट प्रकरणें भाग २ रा | ।१२ |
| *मंडळ–त्रैमासिकः-१८४२-४३-४४-४५-४६-४७-४८-४९-५०-५१-५२-५३-५४-५५-५६-५७ प्रत्येकीं | रु. ३ |
| *१७ वार्षिक इतिवृत्त ( शके १८३८ ) | ३ |
| १८ चतुर्थ-संमेलन-वृत्त (शके १८३८) | ३ |
| *१९ राजवाडे-खंड-स्थलसूची | ४ |
| *२० पंचम संमेलन-वृत्त (शके १८३९) | ३ |
| २१ संशोधनसंग्रह (१८३९) छापत आहे. | |
| २२ चंद्रचूड–दप्तर–कला १ | ३ |
| २३ महाराष्ट्र–सारस्वत ( संपलें ) | |
| २४ षष्ठ संमेलन-वृत्त ( १८४० ) | ४ |
| २५ सप्तम संमेलन वृत्त ( १८४१ ) | ३ |
| २६ संशोधकाची छोटी जंत्री (श्री. द. वि. आपटे ) | ।४ |
| २७ प्रदर्शन परिचय | ।४ |
| *२८ फारसी पत्रव्यवहार–मूळ व भाषांतर ( कंपनी व पेशवे ) | ५ |
| २९ फार्सी–मराठी–कोश | ४ |
| ३० शिवचरित्र साहित्य खंड १ ला | १।८ |
| ३१ Historical Miscellany | १ |
| ३२ पुरंदरे-दप्तर-भाग १ (कृ.वा.पुरंदरे) ( छत्रपति राजाराम ते पानिपत अखेर ) | ४ |
| ३३ शिवचरित्र साहित्य खं. २ रा. | ४ |
| ३४ द. म. इतिहासाचीं साधनें खंड १ ला | २ |
| ३५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खं. १ | २ |
| ३६ राजाराम–चरितम् | १।८ |
| ३७ मंडळांतील नाणीं | १ |
| †३८ शिवचरित्र साहित्य खंड ४ था | १।८ |
| ३९ A History of the late Revolution in the Kingdom of Golconda मराठी विवेचन | रु. ४ |
| †४० ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १ ला. | १।८ |
| †४१ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड २ रा. | २ |
| †४२ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड २ रा. | १।८ |
| ४३ मंडळ चित्र ग्रंथ–चित्रें २० किं. | ।८ |

**टीप**–ट. ह. व बंगी, व्ही. पी. वगैरे खर्च निराळा पडेल. घाऊक घेणारांस चांगलें कमिशन देऊं. माहितीपत्रक मागवा. + दुर्मिळ सबब वाढविलेल्या किंमती.
† हा ग्रंथ त्रैमासिकांत भागशः प्रसिद्ध झाला आहे.